दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी
प्रथम वर्ग मुख्य परीक्षा - 2023

# 2023

**B19**

| प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. |
| --- |
| **10451** |

परीक्षा दि. 28/09/2024.

# PAPER – I/ पेपर क्रमांक – I

## Civil Procedure Code, Transfer of Property Act, Specific Relief Act, Law of Contracts, Sale of Goods Act and Partnership Act

## सिव्हिल प्रोसिजर कोड, ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट, लॉ ऑफ कॉन्ट्रक्ट्स, सेल ऑफ गुड्स ॲक्ट तसेच पार्टनरशिप ॲक्ट

**Time : 3 Hours**
**वेळ : 3 तास**

**Max. Marks : 100**
**कमाल गुण : 100**

SEAL

*Note / सूचना :*

(1) *All questions are **compulsory**.*
*सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*

(2) *Question No. 1 carries 20 marks. **All** other questions carry **equal** marks i.e. **16 marks each**.*
*प्रश्न क्रमांक 1 ला 20 गुण असून उर्वरित **सर्व** प्रश्नांना **समान** म्हणजेच 16 गुण आहेत.*

(3) *Your answers must be to the point, wherever possible quoting the specific provision of law.*
उत्तरे मुद्देसुद असावीत. आवश्यक तेथे कायद्यातील तरतुदी नमूद कराव्यात.

(4) *Do not reproduce any question. Write only question's number against the answer.*
उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न पुन्हा लिहू नयेत. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करून उत्तर लिहावे.

(5) *Wherever option has been given only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Excess responses shall be ignored.*
ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे दुर्लक्षित केली जातील.

(6) *"Other than cited cases, candidate should not write roll number, any names (including their own), signature, address or any indication of their identity anywhere inside the answer book otherwise he will be penalised."*
"उदाहरणादाखल दिलेल्या प्रकरणाशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये. अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल."

(7) ***English** version of the question shall be authentic in case of any type of any ambiguity.*
कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत, इंग्रजी भाषांतर अधिकृत समजले जाईल.

(8) ***All** questions can be attempted only in one language either in **English** or in **Marathi** as per the option given in the application form.*
उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार **सर्व** प्रश्नांची उत्तरे **इंग्रजी** किंवा **मराठी** यापैकी एकाच भाषेत लिहिली पाहिजेत.

(9) *Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.*
उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तदनंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

1. Write a judgment on following facts. 20

Pay attention to following points :

(1) Judgment must be in proper format.

(2) Frame proper issues and record findings on them.

(3) Conclude the judgment with operative order.

(4) Both parties have adduced oral and documentary evidence. Imagine the evidence and record findings.

खाली नमूद केलेल्या कथनावरून न्यायनिर्णय लिहा.

खालील मुद्द्यांकडे लक्ष द्या :

(अ) न्यायनिर्णय विहीत नमून्यात असणे आवश्यक आहे.

(ब) योग्य मुद्दे काढावेत आणि त्यावरील निष्कर्ष द्यावेत.

(क) अंतिम आदेशाने न्यायनिर्णयाचा शेवट करावा.

(ड) दोन्ही पक्षांनी तोंडी व कागदोपत्री पुरावे सादर केले आहेत. आपल्या कल्पनाशक्ती प्रमाणे दोन्ही बाजूंचा पुरावा आहे असे समजावे.

**Facts for judgment :**

**Plaintiff's case is as follows :**

Plaintiff Ram purchased 5 acres land from defendant no. 2 Bibishan on 1-1-2013 under registered sale deed. He tried his level best but his name could not be entered in revenue record of suit land.

In the year 2016 defendant no. 1 Ravana entered his name in revenue record of suit land behind the back of plaintiff Ram. In the year 2023 Ravana obstructed Ram from entering into the suit land by denying his title and possession over suit land. So Ram filed suit for declaration of ownership with perpetual injunction against Ravana and Bibishan.

**Defendants case/pleading :**

Despite sufficient opportunities defendant Bibishan did not file written statement. Defendant Ravana contested the suit by denying plaintiff's title and possession over suit land and asserted his own since 2016 onwards. According to him he perfected his title over suit land by way of adverse possession. He raised objection that plaintiff's name never recorded in revenue record on the basis of sale-deed. Plaintiff never challenged entries in his (Ravana) name mutuated in revenue record. Plaintiff has no cause of action. Suit is not within limitation. Market value of suit land is above 20 lakhs. Plaintiff has not valued suit in proper manner. So this court has no jurisdiction to try and entertain present suit. As such he prayed to dismiss the suit with costs.

**न्यायनिर्णयाकरिता तथ्ये :**

**वादीची कथने खालीलप्रमाणे :**

दि. 1-1-2013 रोजी वादी रामने प्रतिवादी क्रमांक 2 बिबिषण कडून पाच एकर जमीन नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेतली. त्याने खूप प्रयत्न करूनही त्या खरेदीखतावरून त्याच्या नावाची नोंद वाद जमिनीच्या महसुली रेकॉर्डला झाली नाही. सन 2016 मध्ये प्रतिवादी क्रमांक 1 रावणने वादीच्या परोक्ष स्वत:च्या नावाची नोंद वाद जमिनीच्या महसुली रेकॉर्डला लावून घेतली. सन 2023 मध्ये प्रतिवादी रावण याने वादीला वाद जमिनीत जाण्यास अडथळा/मज्जाव केला. त्याने वादीची वाद मिळकतीवरील मालकी व ताबा नाकारला. म्हणून रामने रावण व बिबिषण यांच्या विरुद्ध मालकी घोषित करून कायम मनाई हुकूम मिळण्यासाठी दावा दाखल केला.

**प्रतिवादीची कथने :**

बऱ्याच मुदती घेवूनही प्रतिवादी बिबिषण ने लेखी म्हणणे सादर केले नाही.

प्रतिवादी रावण याने वादीची वाद जमीनी वरील मालकी व ताबा नाकारला व दाव्याला आव्हान दिले.

दाव्यातील संपूर्ण कथने नाकारली. त्याच्या मते सन 2016 पासून त्याचा वाद जमीनीवर प्रतिकूल कब्जा आहे. प्रतिकूल कब्जा आधारे वाद जमीनीवर त्याची मालकी कायम झालेली आहे. त्याने आक्षेप घेतला की, खरेदीखताआधारे वादीचे नांव वाद जमीनीच्या महसुली रेकॉर्डला कधीही नोंदले गेलेले नाही. वादीने वाद जमीनीच्या महसुली रेकॉर्डला जी त्याच्या (रावणच्या) नावाची नोंद झाली तिला कधीही आव्हान दिलेले नाही. दावा देण्यास कारण घडलेले नाही. दावा मुदतीत नाही. दावा मिळकतीचे बाजारी मूल्य 20 लाखापेक्षा जास्त आहे. वादीने दाव्याचे मूल्यांकन योग्य न केल्यामुळे प्रस्तुत दावा चालविण्याचा या कोर्टाला अधिकार नाही. सबब दावा खर्चासह रद्द करण्यात यावा.

2. Write short notes on **any four** of the following : 16

(a) Which properties do not come under the purview of Transfer of Properties Act ?

(b) Difference between rejection of plaint and return of plaint.

(c) Representative suit.

(d) Effect of non registration of partnership firm.

(e) What is summary suit ?

(f) Procedure while compromising the suit on behalf of minor plaintiff or defendant.

खालीलपैकी **कोणत्याही चार** विषयावर थोडक्यात टिप्पणी लिहा :

(अ) कोणत्या मिळकती, मिळकती हस्तांतरण कायद्याच्या कक्षेत येत नाहीत ?

(ब) दावा नाकारणे आणि दावा परत करणे यातील फरक.

(क) प्रतिनिधी दावा/खटला.

(ड) भागिदारी संस्था न नोंदणी करण्याचे परिणाम.

(इ) समरी सूट (सारांश सूट) म्हणजे काय ?

(फ) अज्ञान वादी किंवा प्रतिवादीच्या वतीने दाव्यात समेट करतानाची प्रक्रिया.

3. Write short notes on **any four** of the following : 16

(a) Injunction when refused ?

(b) Restitution.

(c) Lis pendense.

(d) Difference between fraud and misrepresentation.

(e) Transposition of party.

(f) Declaratory decrees.

खालीलपैकी **कोणत्याही चार** विषयावर थोडक्यात टिप्पणी लिहा :

(अ) मनाई हुकूम कधी नाकारता येतो.

(ब) प्रत्यास्थापन.

(क) प्रलंबित वाद तत्व.

(ड) लबाडी आणि विपर्यास यातील फरक.

(इ) पक्षकारांचे हस्तांतरण.

(फ) घोषणात्मक हुकूमनामा.

4. Answer **any two** of the following : 16

(a) Difference between proper parties and necessary parties.

(b) Explain quasai contracts.

(c) Difference between vested interest and contingent interest.

खालीलपैकी **कोणत्याही दोन** ची उत्तरे लिहा :

(अ) योग्य पक्ष आणि आवश्यक पक्ष यातील फरक.

(ब) सदृष्य करार.

(क) निहित हितसंबंध आणि घटनासापेक्ष हितसंबंध यातील फरक.

5. Answer **any two** of the following : 16

(a) Define unpaid seller and what are his rights ?

(b) What are the rights and liabilities of minor partner in partnership firm ?

(c) What is difference between reference, review and revision ?

खालीलपैकी **कोणत्याही दोन** ची उत्तरे लिहा :

(अ) अप्राप्त मूल्य विक्रेता ची व्याख्या व त्याचे अधिकार काय आहेत ?

(ब) भागीदारी संस्थेत अज्ञान भागीदाराचे हक्क व जबाबदाऱ्या.

(क) संदर्भ, पुनर्विलोकन आणि पुनःनिरीक्षण यातील फरक लिहा.

6. Write short notes on **any four** of the following : 16

(a) Effect of death of party in pending suit.

(b) Suit to include whole claim.

(c) Novation of contract.

(d) Mode of determining existence of partnership firm.

(e) Rights of agent.

(f) Transfer of decree.

खालीलपैकी **कोणत्याही चार** वर संक्षिप्त टिप्पणी लिहा :

(अ) प्रलंबित दाव्यातील पक्षकाराच्या मृत्युचे परिणाम.

(ब) दाव्यात संपूर्ण मागण्यांचा समावेश.

(क) कराराचे नूतनीकरण.

(ड) भागीदारी संस्था अस्तित्वात असल्याचे निर्धारीत करणारी पद्धती/प्रकार.

(इ) अभिकर्त्याचे अधिकार.

(फ) हुकूमनाम्याचे हस्तांतरण.

---

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मुख्य परीक्षा - 2023

2023

परीक्षा दि. 28/09/2024.

**C19**

| प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. |
|---|
| 20451 |

# Paper – II/ पेपर क्रमांक – II

**Indian Penal Code, Evidence Act, Code of Criminal Procedure, SC and ST (Prevention of Atrocities) Act, 1989, Protection of Civil Rights Act, 1955, Essay on Current Legal Topic**

**भारतीय दंड संहिता, पुरावा अधिनियम, फौजदारी प्रक्रिया संहिता, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८९, नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५, वर्तमान कायदेशीर विषयावर निबंध**

**Time : 3 Hours** | **Max. Marks : 100**
**वेळ : 3 तास** | **कमाल गुण : 100**

**Note/सूचना :**

(1) Question Nos. **9** and **10** are **compulsory**.
प्रश्न क्रमांक **9** व **10 अनिवार्य** आहेत.

(2) Answer **any six** from the remaining questions.
उर्वरित प्रश्नांमधून **कोणतेही सहा** प्रश्न सोडवावेत.

(3) Marks to **each** question are indicated by a figure in the margin on the right hand side.
प्रत्येक प्रश्नासमोरील उजव्या बाजूच्या समासातील अंक गुण दर्शवितात.

(4) Wherever option has been given, only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Excess responses shall be ignored.
ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतील त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे दुर्लक्षित केली जातील.

(5) Do not reproduce any question. Write only question's number against the answer.
उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न पुन्हा लिहू नयेत. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करून उत्तर लिहावे.

(6) "Other than cited cases, candidate should not write roll number, any names (including their own), signature, address or any indication of their identity anywhere inside the answer book otherwise he will be penalised."
''उदाहरणदाखल दिलेल्या प्रकरणांशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.''

(7) **English** version of the question shall be authentic in case of any type of ambiguity.
कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत, **इंग्रजी** भाषांतर अधिकृत समजले जाईल.

(8) All questions can be attempted only in one language either in **English** or in **Marathi** as per the option given in the application form.
उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार सर्व प्रश्नांची उत्तरे **इंग्रजी** किंवा **मराठी** यापैकी एकाच भाषेत लिहिली पाहिजेत.

(9) Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.
उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तदनंतर) सोडवल्यास, दुसरा उपप्रश्न दुर्लक्षित केला जाईल.

SEAL

P.T.O.

1. Write short notes : 10

(a) Complaint

(b) Cognizable offence

(c) Victim

(d) Information in cognizable cases (F.I.R.)

संक्षिप्त टिपा लिहा :

(अ) फिर्याद

(ब) दखलपात्र गुन्हा

(क) पीडित

(ड) दखलपात्र खटल्याची खबर (एफ.आय.आर.)

---

2. Define **any four** : 10

(a) Injury

(b) Hurt

(c) Grievous hurt

(d) Wrongful gain and wrongful loss

(e) Punishment

कोणत्याही चार व्याख्या (परिभाषा) लिहा :

(अ) क्षती

(ब) दुखापत

(क) गंभीर दुखापत

(ड) गैरलाभ आणि गैरहानी

(इ) शिक्षा

---

3. **State and discuss in brief the provisions pertaining to compensation provided in code of criminal procedure.** 10

फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये प्रदान केलेल्या नुकसान भरपाईशी संबंधित तरतुद सांगा आणि त्यावर थोडक्यात चर्चा करा.

---

4. Define **all** : 10
(a) Robbery
(b) Theft
(c) Criminal force
(d) Common intention
(e) Admission

सर्व व्याख्या (परिभाषा) लिहा :
(अ) जबरी चोरी
(ब) चोरी
(क) फौजदारीपात्र बलप्रयोग
(ड) समान हेतू
(इ) कबुली

---

5. Discuss in brief the provision of trial of warrant cases by Magistrate including the cases instituted on police report and cases instituted otherwise than on police report. 10

पोलिस अहवालावरून दाखल आणि पोलिस अहवालाशिवाय दाखल केलेल्या न्यायदंडाधिकाऱ्यासमोरील वारंट खटल्याची संपरिक्षेविषयी सविस्तर चर्चा करा.

---

6. Discuss in brief the presumption in respect of abetment of suicide by a married woman and presumption as to dowry death. 10

विवाहित महिलेस आत्महत्येस प्रवृत्त केल्या संदर्भातील आणि हुंडाबळी संदर्भातील गृहीतकेची थोडक्यात चर्चा करा.

---

7. How electronic records may be proved ? 10

इलेक्ट्रॉनिक नोंदी (रेकॉर्डस्) कसे सिद्ध केले जाऊ शकतात ?

---

8. (a) Define "Economic boycott" as defined by S.C. and S.T. (Prevention of Atrocities) Act, 1989. 5

(b) Whether the Probation of Offenders Act, 1958 is applicable to any person above the age of fourteen years who is found guilty under the Protection of Civil Rights Act, 1955 ? 5

(अ) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989 मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे ''आर्थिक बहिष्कार'' परिभाषित करा.

(ब) चौदा वर्षावरील कोणताही व्यक्ति जो नागरी हक्क संरक्षण कायदा, 1955 खाली दोषी आढळलेला आहे त्यास प्रोबेशन ऑफ अफेन्डर्स अ‍ॅक्ट 1958 लागू आहे का ?

---

**9.** Write essay on **any one** of the following : **20**

(a) Impact of social media on Judiciary

(b) Role of judges in speedy Justice delivery

(c) Justice delayed is Justice denied

खालीलपैकी **कोणत्याही एका** विषयावर निबंध लिहा :

(अ) सामाजिक माध्यमांचा न्याय व्यवस्थेवरील प्रभाव

(ब) तत्परतेने न्यायदान करण्यामध्ये न्यायाधीशांचे योगदान

(क) विलंबाने न्याय म्हणजे न्याय नाकारणे

---

**10.** Write judgment on the following facts. **20**

(Candidates shall write the facts in detail and write judgement based on their power of imagination for missing facts.)

'A' was present in house along with 'B' his 14 years son. 'C' all of sudden enters into the house along with stick and beat 'A'. On shouts of 'A', neighbour 'D' came running towards the house of 'A'. By seeing 'D' coming 'C' comes out of the house and runs away alongwith stick. Neighbour 'D' saw 'C' running away with stick by coming out from the house of 'A'.

At trial 'A' and his 14 years son 'B' stickup to their statements in court. Neighbour 'D' did not support prosecution and was declared hostile. But in cross-examination taken by public prosecutor for the state he admitted that he saw 'C' running away with stick.

Defence of accused is that of false implication on account of land dispute.

खालील तथ्यांच्या आधारे निकालपत्र लिहा.

(उमेदवारांनी सदर तथ्ये तपशीलवार लिहावीत व आवश्यक तिथे स्वत:च्या कल्पना शक्तीच्या आधारावर निकालपत्र लिहावे.)

'अ' हा त्याच्या घरात त्याचा 14 वर्षाचा मुलगा 'ब' सह हजर होता. 'क' हा अचानक काठीसह घरात घुसला आणि 'अ' ला मारहाण केली. 'अ' च्या आरडा-ओरड मुळे शेजारील 'ड', 'अ' च्या घराकडे धावत आला. 'ड' ला येताना पाहिल्यामुळे 'क' घराबाहेर आला आणि काठीसह पळून गेला. शेजारील 'ड' ने 'क' ला 'अ' च्या घरातून काठीसह पळताना पाहिले.

संपरीक्षेदरम्यान 'अ' आणि त्याचा 14 वर्षाचा मुलगा 'ब' आपल्या जबाबावर न्यायालयात ठाम राहिले. शेजारील 'ड' हा अभियोग पक्षाला सहाय्य करत नाही आणि त्याला फितूर घोषित केले. परंतु सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांनी घेतलेल्या उलट तपासादरम्यान त्याने 'क' ला काठीसह पळताना पाहिल्याचे कबुल केले.

आरोपीचा बचाव आहे की, जमिनीच्या वादामुळे त्याला खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आले आहे.

---

SEAL